## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या अॅपेलेट ऑथॉरिटीसमोर

### अपिल क्रमांक ४/२०११

### सुनावणी दिनांक १५/३/२०११

श्री किशोर बापूराव टाकणे
सह्याद्री को.ऑप.हौ.सोसायटी,
बी.नं.सी-२, रुम नं.२/३, ८ बी,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ — अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई — प्रतिवादी

## आदेश

श्रीयुत किशोर बापूराव टाकणे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ४/२/२०११ रोजी अर्ज करुन, त्यामध्ये असे स्पष्ट केले की, द्वितीय अपिल क्र.४८९७ दिनांक ११/५/२०१० ची सुनावणी श्रीयुत रामानंद तिवारी, मा.मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांच्याकडे झाली होती. त्या सुनावणीनुसार आदेश निर्गमीत होऊन त्याची प्रत मंडळास माननीय मुख्य माहिती आयुक्त कार्यालयामार्फत पाठविण्यात आलेली होती. सदरहू आदेशाची छायांकित प्रत त्यांना साक्षांकित करुन वैयक्तिकरित्या देण्यात यावी, असा अर्ज करण्यात आलेला होता.

जन माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी सदरहू अर्जाबाबतची माहिती आहे त्या स्वरुपात दिनांक ८/२/२०११ च्या पत्राद्वारे आदेशासहीत पाठविलेली असल्याचे स्पष्ट केले. सदरहू माहिती श्री टाकणे यांना मिळाली का, याबाबत विचारणा केली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती मिळाली असून, त्याबाबत त्यांनी स्थळप्रतीवर माहिती अधिकारी यांनी मा.राज्य माहिती आयुक्त यांची दिनांक ३१/५/२०१० विनासाक्षांकित

आदेशाची प्रत मिळाली म्हणून सही देखील केलेली आहे. मात्र सदरहू प्रत जन माहिती अधिकारी यांनी साक्षांकित केलेली नसल्यामुळे, त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे सध्याचे अपिल दिनांक १५/२/२०११ रोजी केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांना सदरहू प्रत साक्षांकित का केली नाही ? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी असे स्पष्ट केले की, त्यांच्याकडे प्राप्त झालेली दिनांक ३१/५/२०१० च्या द्वितीय आदेशाची प्रत, मा.राज्य माहिती आयुक्त यांची स्वाक्षरी नसल्याने, माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्याची छायांकित प्रत साक्षांकित न करताच दिनांक ८/२/२०११ च्या पत्राद्वारे दिलेली होती. त्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे सदरहू साक्षांकित प्रत न मिळाल्याबाबत अपिल दाखल केलेले आहे. त्यामुळे मा.राज्य माहिती आयुक्त यांना दिनांक ३१/५/२०१० चे मप्रनि मंडळाकडे द्वितीय अपिलातील आदेश स्वाक्षरी नसताना, पोस्टामार्फत प्राप्त झालेले असल्यामुळे, ते आदेश वैध धरावेत किंवा कसे? याबाबत दिनांक ३/३/२०११ च्या पत्राद्वारे मार्गदर्शन मागितलेले आहे. सदरहू पत्राची प्रत श्रीयुत किशोर टाकणे यांनादेखील पाठविण्यात आलेली आहे, असे स्पष्ट केले. परंतु, सदरहू प्रत श्री किशोर टाकणे यांना न मिळाल्याचे प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यान (दिनांक १५/३/२०११ रोजी) त्यांनी स्पष्ट केले. सदरहू प्रत दिनांक ३/३/२०११ रोजी जावक क्रमांक देऊन पाठविण्याकरिता दिली असता, जावक विभागाकडे चौकशी केली असता असे दिसून आले की, सदरहू प्रत दिनांक ११/३/२०११ रोजी श्री किशोर टाकणे यांच्याकडे स्पीटपोस्टद्वारे पाठविण्यात आली. त्यामुळे त्यांना सदरहू प्रत प्रथम अपिलाच्या सुनावणीपर्यंत मिळालेली नव्हती.

वरील परिस्थितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या दिनांक ३/३/२०११ च्या पत्राबाबत आदेश प्राप्त न झाल्याने, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी श्री किशोर टाकणे यांना दिनांक ३/३/२०११ च्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी मा.राज्य माहिती आयुक्त यांना लिहिलेल्या पत्राची प्रत प्राप्त करुन देण्यात आली. तसेच, सदरहू स्वाक्षरीशिवाय प्राप्त झालेल्या दिनांक ३१/५/२०१० च्या आदेशाची अशा परिस्थितीमध्ये साक्षांकित प्रत अपिल करणार यांना आहे तशी दाखविण्यात आली आणि सदरहू आदेशाच्या छायांकित प्रती त्यांना प्राप्त झालेल्या असल्यामुळे, अपिल निकाली काढण्यात येत आहे. अपिल करणार यांनी वरील बाबतीत माननीय राज्य माहिती आयुक्त यांच्या कार्यालयाकडे स्वाक्षरी असणारी साक्षांकित प्रत मिळणेबाबत योग्य तो अर्ज करणे इष्ट होईल, असे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे मत आहे.

दिनांक १५/३/२०११ रोजी मुंबई येथून.

( द. त्रि. देवळे )
अपिलीय अधिकारी